# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State: महाराष्ट्र  जिल्हा District: मुंबई  पोलीस ठाणे Police Station: ……  पहिली खबर क्र. FIR No.: 02  वर्ष Year: 2026  दिनांक Date: 04/02/26

2. (i) अधिनियम Act: भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८  कलमे Sections: ७.
   (ii) अधिनियम Act: ……  कलमे Sections: ……
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections: ……

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day: सोमवार  तारीख पासून Date from: 02/02/26  वेळ Time: 16:30  तारीख पर्यंत Date to: 03/2/26  वेळ Time: 19:80

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.००  (2) ०३.०० ते ०६.००  (3) ०६.०० ते ०९.००  (4) ०९.०० ते १२.००  (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.००  (7) १८.०० ते २१.००  (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S.  तारीख Date: 02/02/2026  वेळ Time: 04:30 वा.

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: 01/26  तारीख Date: 04/02/26  वेळ Time: 05:15

4. माहितीचा प्रकार Type of Information: समक्ष  लेखी / तोंडी Written / Oral: लेखी.

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S.: पूर्वेस  चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No.: ६ कि.मी.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: मासोळी हॉटेलच्या बाहेर फुटपाथवर  ठिकाणाचे नंबर No. if any: ……  गल्ली Ward: ……  रस्त्याचे नाव Name of road: ……

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place: मनोरमा नगरकर मार्ग, माहिम (प) मुंबई - 16.  गाव Village  पोस्ट Post  तालुका Taluka  जिल्हा Dist. ……  राज्य State ……

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station: ……  तालुका Taluka: ……  जिल्हा Dist.: ……  राज्य State: ……

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name: माधुरी माने  (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: धर्माजी माने.

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: 36  (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय  फोन नं. Phone No.: 9082483392

(e) पारपत्र क्रमांक Passport No.: –  दिल्याचा दिनांक Date of issue: –  दिल्याचे ठिकाण Place of Issue: –  (f) व्यवसाय Occupation: नोकरी - पोलीस निरीक्षक

(g) धर्म Religion: हिंदू  जात Caste: मराठा  जनजात Sub-Caste: ……

(h) पत्ता Address: बि.नं. 43,  गल्ली/सर्व्हे नं. Ward: रूम नं. १,  घर/नाव नं. House Name No.: रमा कॉटेज, सरपोच्यानवाला रोड,  फोन/मो. Phone No.  पॅन नं. Pan No.  वोटर्स नं. Card No. ……

रस्त्याचे नाव Road: वरळी, मुंबई  जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place: ……  गाव Village: ……  पोस्ट Post: ……  पो. स्टे. P. Stn.: ……

तालुका Taluka: ……  जिल्हा Dist.: ……  राज्य State: ……  सध्याचा पत्ता Present Address: ……

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा. ) ( संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे. )

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

१) कविता निलेश धनावडे, वय ५४ वर्षे, व्यवसाय - नोकरी पद - अनुज्ञापन निरीक्षक, मनपा - जी/उत्तर विभाग, दादर (प) मुं. रा. रूम नं. 503, आनंद भुवन चामुंडा सोसा, नायकवाडी माहिम (प) मो. 7738199922
२) सम्मद सरफुद्दीन इमाम, पद - वरिष्ठ अनुज्ञापन अधिकारी, मनपा जी/उत्तर विभाग, दादर (पाहिजे आरोपी)

(G.C.P.) K 1043 (A) (1000–1-2025)

"फिर्याद"

यातील फिर्यादी श्रीमती माधुरी धर्मजी माने, पद-पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांची फिर्याद स्वतंत्र कागदावर नोंद केली असून तिच गुन्हयाची प्रथम खबर अहवालं संबोधण्यात येत आहे.

समक्ष.

(निलेश पाटील)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Pdmane
04/02/26

फिर्याद दिनांक ०४/०२/२०२६

मी, माधुरी धर्माजी माने, वय ३७ वर्षे, व्यवसाय : नोकरी (पोलीस निरीक्षक), नेमणुक– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई, रा.ठि. बिल्डिंग नं ४३, रूम नं ०१, शमा कॉटर्स, वरळी पोलीस वसाहत, वरळी मुंबई–४०००३०, मो.क्र. ९०८२४८३३९२

---

मी वरील प्रमाणे असून, २९/०८/२०२४ पासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पोलीस निरीक्षक या पदावर नेमणुकीस आहे.

मी बुधवार दिनांक ०२/०२/२०२६ रोजी कार्यालयात कर्तव्यावर हजर असताना, मा.अप्पर पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. मुंबई यांचेकडील पडताळणी कारवाई क्र. ०८/२०२६ मध्ये पडताळणी व सापळा कारवाईकरीता माझी व पर्यवेक्षण अधिकारी म्हणुन पोनि.संदिप गायकवाड यांची नेमणुक केल्याबाबत आदेश मिळाल्याने नमुद पडताळणी मधील तक्रारदार शादाब मोहम्मद जावेद सय्यद, वय ३५ वर्षे यांचेकडे त्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने चर्चा केली. त्यांनी सांगितले की, 'माहिम इलाके में दुकान नं ०१, रिजवी मेंशन बिल्डिंग, अॅक्सीस बॅक जवळ, बाबा फालुदा जवळ, एल जे रोड, माहिम (प), मुंबई येथे फुड मोहल्ला कॅफे चालवतात. सदर दुकान त्यांनी ०१/०२/२०२५ रोजी पाच वर्षाकरीता भाडेतत्वावर घेतले आहे.

दिनांक ११/११/२०२५ रोजी १५:४० वा महानगर पालिका, जी/नॉर्थ, दादर, लायसन्स विभागाच्या कविता धनावडे नावाची अनुज्ञापन निरीक्षक महिला अधिकारी तक्रारदार यांच्या मोहल्ला कॅफेजवळ आल्या होत्या. त्यांनी तक्रारदार यांच्या कॅफेच्या बाहेर लावलेल्या **Glow Sign Board** बाबत कायदेशीर कारवाई करण्याबाबत नोटीस देवुन जी/नॉर्थ लायसन्स विभाग, महानगरपालिका येथे येण्यास सांगितले. परंतु ते त्यांच्या घरगुती कारणामुळे नोटीस दिल्यानंतर ०२ महिने महानगर पालिका कार्यालयात जावु शकले नाही.

दिनांक २७/०१/२०२६ रोजी तक्रारदार शादाब सय्यद हे त्यांच्या कॅफेमधील मॅनेजर श्रीमती स्विटी दामोदर यांचेसह जी/नॉर्थ, लायसन्स विभाग, महानगर पालिका कार्यालयात श्रीमती कविता धनावडे यांना भेटले असता, श्रीमती धनावडे यांनी **Glow Sign Board** बाबत महानगर पालिकेकडुन परवानगी घेतलेली नसुन अनधिकृतपणे बोर्ड लावलेला आहे. त्याकरीता तक्रारदार यांना १,१९,०००/–रूपये तात्काळ दंड भरावा लागेल असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी **Glow Sign Board** बाबत महानगर पालिकेकडुन परवानगी घ्यावी लागते याबाबत माहित नसल्याचे सांगितले. तसेच त्यांचेकडे वर नमुद दंडाची रक्कम नसुन सदर रक्कम भरू शकत नसल्याचे सांगितले. त्यावेळी श्रीमती धनावडे यांनी तक्रारदार यांना १,१९,०००/–रू. दंड जर भरला नाही तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करून दिलेली नोटीससह कोर्टात पुढील कारवाई करीता पाठविण्यात येईल, असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी पुन्हा श्रीमती धनावडे यांचेकडे दंड भरण्याकरीता पैसे नसल्याचे सांगितले असता श्रीमती कविता धनावडे यांनी तक्रारदार व त्यांचे मॅनेजर स्विटी दामोदर यांना त्यांचे वरिष्ठ अधिकारी वरिष्ठ अनुज्ञापन निरीक्षक श्री. सय्यद सरफुद्दीन इमाम यांचेकडे कॅबीनमध्ये घेवुन गेले. श्री. सय्यद सरफुद्दीन इमाम यांनी **Glow Sign Board** बाबत कोठे कोर्ट कचेरीच्या कारवाईमध्ये अडकता असे सांगुन तक्रारदार यांना घाबरविले. त्यावेळी श्रीमती धनावडे यांनी सदरचे प्रकरण मिटविण्याकरीता ४०,०००/– रू लाचेची मागणी केली होती. त्यावेळी त्यांचे वरिष्ठ अधिकारी श्री. सय्यद सरफुद्दीन इमाम यांनी श्रीमती धनावडे यांचेसोबत बोलुन

सदरचे प्रकरणामध्ये कोर्ट कचेरीमध्ये न जाता इथेच प्रकरण मिटवुन घ्या असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांचा कॅफेचा व्यवसाय मागील ३ ते ४ महिन्यापासुन ठिक चालत नसल्याचे सांगितले असता वर नमुद दोन्ही अधिकारी नाराज होवुन त्यांनी तक्रारदार व त्यांचे मॅनेजर यांना ४०,०००/–रूपयांचा बंदोबस्त झाल्यास सोमवार दिनांक ०२/०२/२०२६ रोजी १६:०० वाजता लायसन्स विभागामध्ये येण्याबाबत सांगितले. तक्रारदार शादाब सय्यद यांच्याकडे अनधिकृतपणे लावलेल्या **Glow Sign Board** बाबत कायदेशीर कारवाई न करण्याकरीता रू ४०,०००/– लाचेची मागणी होत असल्याचे खात्री झाल्याने व तक्रारदार यांना लोकसेवक श्रीमती कविता धनावडे व श्री. सय्यद सरफुद्दीन इमाम यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ०२/०२/२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय वरळी मुंबई येथे वर नमुद लोकसेवकांच्या विरोधात तक्रार देण्यास आले असल्याचे त्यांनी सांगितले. तक्रारदार यांना लिहिता वाचता येत असल्यामुळे त्यांच्याकडून त्यांच्या स्वहस्ताक्षरात हिंदीमध्ये तक्रार अर्ज लिहुन घेतला.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कारवाईकरीता शासकीय पंचांची आवश्यकता असल्याने प्रभारी अंमलदार पो.ह. शेमडकर यांच्यामार्फतीने दोन शासकीय पंच नामे १) श्री. प्रसाद नारायण खिलारी, वय २९ वर्षे, पद – महसुल सहायक, उपजिल्हाधिकारी(अति. निष्का) मुलुंड मुंबई, रा.ठि – रूम नं ६६२, शिवाजीराव शेंडगे को. ऑ.हौ.सोसायटी, सेक्टर १, घनसोली, नवी मुंबई. कार्यालयाचा पत्ता – टोपीवाला कॉलेज इमारत, मुलुंड (पुर्व), मुंबई. मो.क्र. ९१३९६४०११३ २) श्री. विशाल विश्राम बर्जे, वय ३१ वर्षे, पद – दुकान परीचर, बृहन्मुंबई महानगरपालिका, बी वॉर्ड सॅन्डहर्स्ट रोड, मुंबई, कार्यालयाचा पत्ता – १२१, रामचंद्र भट मार्ग, बाबुलाल टॅक क्रॉस लेन, मुंबई ०९ रा.ठि. – सिद्धम चाळ, बौद्ध नगर, हनुमान टेकडी, सांताक्रुझ (पुर्व), मुंबई. यांना पाचारण केले. दोन्ही पंच कार्यालयात हजर झाल्यानंतर आम्ही त्यांना तक्रारदार यांची प्रथम ओळख करुन दिली. तसेच त्यांच्या तक्रारीविषयी थोडक्यात हकिकत सांगून, तक्रारदार यांचा तक्रारी अर्ज पंचाना वाचण्यास दिला. पंचांचा तक्रारी अर्ज वाचून झाल्यानंतर त्यावर समक्ष म्हणून आम्ही व पर्यवेक्षण अधिकारी म्हणुन पोलीस निरीक्षक, संदीप गायकवाड तसेच दोन्ही पंचानी स्वाक्षरी करून सदरचा अर्ज आमचे ताब्यात घेतला.

तद्नंतर पो.नि. गायकवाड, आम्ही, दोन्ही पंच, तक्रारदार असे लाप्रवि कार्यालयातील तांत्रिक कक्षात गेलो. सदरवेळी तांत्रिक कक्षातील पो.शि. मिंडे यांच्या मदतीने तक्रारदार व दोन्ही पंचांना व्हॉईस रेकॉर्डरची माहिती देवून पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या दक्षताबाबत सुचना दिल्या. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मायक्रो एस.डी.कार्ड टाकुन माझे, तक्रारदार व दोन्ही पंच यांचे प्रथम वक्तव्य ध्वनिमुद्रीत करण्यात आले. त्यानंतर आम्ही पंचाना पडताळणी/सापळा पथकात नेमणुक करण्यात आलेल्या अधिकारी/अंमलदार व पोलीस वाहने/वाहन चालक यांची ओळख करून दिली व त्यांना गोपनीय कक्षात बोलाविले त्याप्रमाणे सर्व पोलीस पथक गोपनिय कक्षात हजर झाले. त्यावेळी पथकास पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून त्वरीत लाच स्विकारण्याची शक्यता असल्याने लगेच सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येईल असे सांगितले.

तद्नंतर तक्रारदार हे लोकसेविका कविता धनावडे यांस मोबाईलवर संपर्क करणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे गोपनीय कक्षामध्ये जावुन पडताळणीच्या अनुषंगाने तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईल वरून १७:२५ वाजता लोकसेवक यांच्या मोबाईलवर कॉल करून कार्यालयामध्ये भेटण्यासंदर्भात विचारणा केली असता लोकसेवक यांनी तक्रारदार यांना भेटायला येण्यास सांगितले. लोकसेवक यांनी तक्रारदार यांना भेटण्यास बोलविल्याने आम्ही

पंच व पथकासह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयातुन दोन शासकीय वाहनातुन रवाना झालो.

पंच क्रमांक ०१ प्रसाद खिलारी यांना तक्रारदार यांचेसोबत लोकसेवक यांचे कार्यालयामध्ये पाठविले. काही वेळाने त्यांनी परत शासकीय वाहनाजवळ येवुन लोकसेवक या दिसुन आल्या नसल्याचे सांगितले. तसेच लोकसेवक यांचेबाबत कार्यालयातील इतर लोकसेवक यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी लोकसेवक या घरी गेल्या असल्याचे सांगितल्याने तक्रारदार यानी त्यांच्या मोबाईलवरून लोकसेवक यांना कॉल केला तेंव्हा लोकसेविका यांनी "निकल गये सभी लोग, में भी, और साहब भी, हम लोग छह बजे परफेक्ट निकल गये थे, तो कल आ जाये, सही चार बजे आईये," असे सांगितले.

तक्रारदार व पंच क. १ यांची लोकसेवक यांच्याशी समक्ष भेट झाली नसुन तक्ररदार व लोकसेवक यांच्यामध्ये झालेले फोनवरील संभाषण ऐकले. नमुद संभाषण दरम्यान लाचेची मागणी स्पष्ट न झाल्यामुळे तसेच लोकसेवक यांनी तक्रारदार यांना उदईक दि. ०३/०२/२०२६ रोजी दुपारी १६:०० वाजता कार्यालयामध्ये बोलविले असल्याने पुढील कारवाई लाप्रवि कार्यालयामध्ये करण्यात आली.

दिनांक ०३/०२/२०२६ रोजी तक्रारदार व दोन्ही पंच यांना ला.प्र.वि कार्यालयात हजर झाले त्यावेळी त्यांना पो.नि. संदिप गायकवाड हे रजेवर असल्याने त्यांचे जागी पो.नि. निलेश पाटील हे पर्यवेक्षण अधिकारी म्हणुन काम पाहणार असल्याचे तसेच पो.ह. ९६०४३१/शिंदे यांचे जागी पो.शि. १८१२४२/ राणे हे पथकात कारवाईकरीता हजर असुन त्यांची ओळख करून देण्यात आली. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मायक्रो एस.डी. कार्ड टाकुन माझे, तक्रारदार व दोन्ही पंच यांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत करण्यात आले. तद्नंतर तक्रारदार यांनी १६:०५ वाजता त्यांचे मोबाईल नं ९००४५८५९६० वरून लोकसेविका श्रीमती कविता धनावडे यांचे मोबाईल नं ७७३८१९९९२२ वर संपर्क करून कार्यालयात आहेत किंवा कसे? याबाबत विचारणा केली असता लोकसेविका यांनी तक्रारदार यांना १० मिनीटांत येत असल्याचे सांगुन त्यांना १६:३० वाजता कार्यालयात येण्यास सांगितले. सदरचा कॉल हा व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आला.

पुढील कारवाई करणेकरीता आम्ही, पंच व पथकासह वाहन क्र.एम.एच ०१ ए.एन १९८४ व वाहन क्र.एम.एच ०१ झेड.ए ३८९ या शासकीय वाहनातुन लोकसेविका श्रीमती कविता धनावडे यांचे कार्यालयास ला.प्र.वि कार्यालयातुन १६:२० वाजता रवाना झालो. तक्रारदार हे पंच क्र.०१ खिलारी यांचेसोबत लोकसेविका यांना भेटण्याकरीता त्यांचे मोटार स्कुटी क्र.एम एच ४७ बीयु १७७५ या दुचाकीने एसबीआय दादर मेट्रो स्टेशन येथे आले. सदरठिकाणी पंच व तक्रारदार यांना सुचना देवुन पंच क्र० ०१ खिलारी यांना तक्रारदार यांच्या शर्टच्या आतील बनीयानला व्हॉईस रेकॉर्डर चालु करून लावुन लोकसेविका यांचे कार्यालयात पाठविण्यात आला. सदरवेळी तक्रारदार हे लोकसेविका कविता यांना भेटले असता त्या तक्रारदार यांना श्री. सय्यद सरफुद्दीन इमाम यांचेकडे घेवुन गेल्या. सदर वेळी लोकसेवक इमाम यांनी **' दो हजार तीन हजार कम कर दो और क्या करेगें, आपको तो एक उन्नीस एक बीस, पकड के वन थर्ड ही बोल रहे है'** असे सांगितले. त्यानंतर **वन थर्ड है आपका उसमें पाच एक हजार मंगता तो कम कर दो** त्यावेळी तक्रारदार यांनी **'टोटल कितना दु.'** अशी विचारणा केली असता लोकसेवक श्री इमाम यांनी **'थर्टी फाय दे दो'** असे सांगितल्याने तक्रारदार शासकीय वाहनाजवळ परत आले. त्यावेळी सदर व्हॉईस रेकॉर्डींग ऐकली असता लोकसेवका यांनी लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट दिसुनद येत नसल्याने पुन्हा लोकसेविका यांना तक्रारदार यांनी कॉल केला असता त्यांनी **'अभी फोन पे कुछ मत पुछिये, इधर आ जाइये और पुछीये'**

टेक्नीशीअन मिंडे यांनी व्हाईसरेकॉर्डर सुरू करून तक्रारदार यांना पंचासमक्ष पुन्हा लोकसेवीका कविता यांना फोन केला असता सपर्क होवु शकला नाही. त्यानंतर लोकसेविका कविता यांना संपर्क करून कोठे आहे? असे विचारले असता लोकसेविका यांनी **'मासोळी, सेना भवन से सिधा आईये '** असे सांगितले. त्यानंतर टेक्नीशीअन मिंडे यांनी तक्रारदाराच्या शर्टच्या आतील बनीयनला व्हाईसरेकॉर्डर सुरू करून पंच क्रं १ खिलारी यांचेसह पाठवीले. सदरवेळी तक्रारदार हे लोकसेविका कविता धनावडे यांना समक्ष भेटले असता तक्रारदार यांनी 'थर्टी फाय थाउजंड अगर दे देगें, तो एक लाख उन्नीस हजार का लिगल फाईन कॅन्सल हो जायेगा' अशी विचारणा केली असता, लोकसेविका यांनी, पंच क्रं १ खिलारी यांचेसमक्ष 'कॅन्सल हो जायेगा' असे उत्तर दिले असता तक्रारदार यांनी 'पक्का ना मॅडम, फिर आगे कोर्ट कचेरी मेरा भाई हॅन्डल नही कर पायेगा' असे सांगितले असता, लोकसेविका कविता धनावडे यांनी, 'कुछ नही करेगें, इसी लिए मैंने आपको साब के पास लेके गये' असे सांगितले.

यावरून लोकसेविका श्रीमती कविता धनावडे यांनी तक्रारदार शादाब मोहम्मद जावेद सय्यद यांच्याकडे लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्यानंतर लागलीच सापळा कारवाईचे आयोजन करण्याचे आम्हा सर्वानुमते ठरले. त्यानंतर पो.नि. पाटील यांनी पंच तक्रारदार व पोलीस पथकास सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाची दक्षता व करावयाची कारवाई याबाबत सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लाचेच्या रक्कमे बाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी त्यांचेकडील रूपये वीस हजार रक्कम घेवुन आल्याचे सांगितले. आम्ही पंच व तक्रारदार यांना अॅन्थ्रोसिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले. तसेच कृत्रिम अंधार करून प्रात्याक्षीक करून दाखविले. त्यानंतर तक्रारदार यांचेकडील उपलब्ध लाचेची रक्कम रू.२०,०००/- (त्यामध्ये रू.५००/- दराच्या भारतीय चलनाच्या ४० नोटा) च्या पोहेकॉ/३७१२ गावडे यांचे मोबाईलमध्ये फोटो काढण्यात आले. स.पो.आ. प्रशासन यांचे कार्यालयातुन घेतलेल्या खेळण्यातील रू. १५,०००/- नोटा. (त्यामध्ये रू.५००/- दराच्या भारतीय चलनाच्या ३० नोटा) असे एकुण ३५,०००/- रूपये लाच म्हणून वापरण्यात येणाऱ्या रक्कमेतील नोटांना पो.ह.चा. ९७०८५९/भुजबळ यांना दिलेल्या सुचनेप्रमाणे त्यांनी अॅन्थ्रोसिन पावडर लावून सदर लाचेची रक्कम पांढऱ्या रंगाच्या लिफाफ्यामध्ये ठेवण्यात आली. सदर लाचेची रक्कम ठेवलेल्या लिफाफ्याला बाहेरून दोन्हीबाजुने कापसाच्या बोळयाने अॅन्थ्रेसीन पावडर लावुन सदरचा लिफाफा तक्रारदार यांच्या पॅन्टच्या पुढच्या उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर पो.नि. पाटिल यांनी पोह. भुजबळ हे सापळा कारवाईमध्ये भाग घेणार नसल्याचे सांगितले.

तक्रारदार यांनी लोकसेवीका कविता धनावडे यांना संपर्क करून कोठे भेटावयाचे विचारले असता त्यांनी यापूर्वी भेटलेल्या मासोळी हॉटेल येथे येण्यास सांगितल्याने पो.नि. पाटील, पंच क्र.०२, व पथकातील अंमलदार चालत जातील व सदर हॉटेलच्या आजुबाजुच्या परिसरात कोणास संशय येणार नाही. असे थांबतील अशा सुचना दिल्या व त्यांचे मागे ०५ मिनीटांनी पंच क्र.०१ खिलारी यांना तक्रारदार यांचे सोबत मासोळी, सेना भवनच्या पुढे लोकसेविका कविता धनावडे यांना भेटण्याकरीता तक्रारदारचे मोटार स्कुटी क्र. एम एच ४७ बीयु १७७५ वरून जातील, असे सांगीतले व तक्रारदारास लोकसेविकास लाचेची रक्कम देण्याकरीता पाठविण्याचे ठरले. त्यानंतर पो.नि. पाटील यांनी तक्रारदार यांना लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा म्हणून तक्रारदार हे डाव्या हाताने हातरूमालाने तोंड पुसुन इशारा दाखविण्याबाबत सांगण्यात आले. त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांच्या शर्टाच्या आतील बाजूस बनियानला लावून पंच क्रमांक ०१ प्रसाद खिलारे यांच्यासह लोकसेवक यांनी सांगितलेल्या हॉटेल मासोळीमध्ये लाचेची रक्कम देण्यासाठी रवाना झाले. त्यापुर्वी इतर पथक हे हॉटेल मासोळी या ठिकाणी पोहचले व संशय येणार नाही अशाप्रकारे आजुबाजुस थांबुन राहिले. थोडया वेळाने लोकसेविका श्री सिध्दीविनायक कम्युनिकेशन सेंटर जवळील फुटपाथवर थांबल्या त्यावेळी तेथे तक्रारदार आले असता

लोकसेविका कविता यांनी तक्रारदार यांना 'पुरा है ना' असे विचारले असता तक्रारदार यांनी ' आपने जो पैतीस हजार बोले थे वो पुरा है, लेकीन वो नोटीस का मॅम कॅन्सल हो जायेगा ना' असे सांगुन ' सर का भी रहेगा इसमें' असे तक्रारदार यांनी विचारले असता लोकसेविका यांनी ' फिर क्या, सबका रहता है' असे सांगितले. त्यानंतर लोकसेविका कविता यांनी तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर ठरले प्रमाणे तक्रारदार यांनी डाव्या हाताने हातरूमालाने तोंड पुसुन लोकसेविकेने लाच स्विकारले बाबत इशारा केला. त्यानंतर लगेच आम्ही व सापळा पथकाने लागलीच पंचांसमक्ष लोकसेविका श्रीमती. कविता धनावडे यांना १९:५० वा लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडले. सदर लोकसेविकेस त्याचे नाव व पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव कविता निलेश धनावडे वय ४८ वर्षे, धंदा नोकरी पद – अनुज्ञापन निरीक्षक (नेमणुक : जी/नॉर्थ विभाग, दादर (पश्चिम), मुंबई ) असे सांगितले. तसेच त्यांचा राहण्याचा पत्ता विचारला असता रूम नंबर ५०३, आनंद भुवन चामुंडा सोसायटी, तायकलवाडी, माहिम (प), मुंबई असे सांगितले.

सदरवेळी लोकसेविका कविता धनावडे यांनी त्यांचे मोबाईल क्र. ७७३८१९९९२२यावरून श्री. सय्यद सरफुद्दीन इमाम यांचे मोबाईल क्रमांक ९८१९०२९३१४ वर संपर्क करून शादाब आला असल्याचे सांगितले त्यांनी ' हा हा ठीकं ये' असे सांगितले. सदरवेळी फोनचा आवाज येत नसल्याने पुन्हा फोन करून लोकसेविका कविता यांनी शादाब यांनी रू.३५,०००/–दिल्याचे सांगितले असता वरिष्ठ अनुज्ञापन निरीक्षक सय्यद सरफुद्दीन इमाम, यांनी ''ठीक आहे'' असे बोलुन संमती दर्शवली, तसा सापळा कारवाईबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी लोकसेविका कविता निलेश धनावडे वय ४८ वर्षे, धंदा नोकरी पद – अनुज्ञापन निरीक्षक (नेमणुक : जी/नॉर्थ विभाग, दादर (पश्चिम), मुंबई) व श्री. सय्यद सरफुद्दीन इमाम, वरिष्ठ अनुज्ञापन निरीक्षक यांनी तकारदार श्री. शादाब सय्यद यांचे फुड मोहल्ला कॅफे, पत्ता दुकान नं ०१, रिजवी मेंशन बिल्डिंग, ॲक्सीस बॅक जवळ, बाबा फालुदा जवळ, एल जे रोड, माहिम (प), मुंबई या दुकानावरील **Glow Sign Board** हा परवानगी न घेता अनधिकृतपणे लावला असल्याबाबत नोटीस दिली, तसेच दंडात्मक रक्कम १,१९,०००/–रू होत असुन दंडाची रक्कम न भरल्यास कायदेशीर कारवाई होईल, असे तकारदारांना सांगुन कार्यालयात भेटायला बोलावुन कायदेशीर कारवाई न करणेकरीता ४०,०००/–रू लाच मागणी पंचासमक्ष करून तडजोडीअंती ३५,०००/–रू लोकसेविका कविता धनावडे यांनी लाच रक्कम स्विकारली. तसेच लोकसेविका कविता धनावडे यांनी लोकसेवक सय्यद सरफुद्दीन इमाम, यांना ३५,०००/–रू लाच रक्कम स्विकारल्याबाबत फोनवरून माहिती दिल्याने लोकसेवक सय्यद इमाम यांनी त्यास संमती दर्शवीली, म्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेशीर तक्रार आहे.

समक्ष,

( निलेश पाटील )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

04/02/26

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ......... तक्रार प्राप्त करून पडताळणी केल्यामुळे.

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ......... ३५,०००/-

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक .........

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख वेळी व ठिकाणी कॉलम 7 मधील आरोपी लोकसेवक १) यांनी तक्रारदार यांचे फुड मोहल्ला कॅफेच्या बाहेर असलेल्या ग्लो साईन बोर्ड हा परवानगी न घेता अनधिकृतपणे लावला असल्याबाबत नोटीस दिली. तसेच दंडात्मक रक्कम १ लाख १८ हजार रुपये होत असून दंडाची रक्कम न भरल्यास कायदेशीर कारवाई न करणेकरीता ४० हजार रुपये लाच मागणी करून तडजोडीअंती रु.३५,०००/- आलोसे क्र. १ यांनी लाच रक्कम पंचांसमक्ष स्विकारली. व आलोसे क्र. ०१ यांनी आलोसे क्र. २ यांना ३५,०००/- रु लाच रक्कम स्विकारल्याचे फोनवरून माहिती दिल्याने आलोसे क्र. ०२ यांनी त्याला संमती दिली म्हणून कॉलम 7 मधील आलोसे विरुद्ध भ्र.प्र.अ. १९८८ कलम ७,१२ अन्वये गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ......... मपोनि दिपीका उंगारे

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, .........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ......... जिल्हा ......... राज्य .........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .......... Rank .......... No. .......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .........

(3) Transferred to P. S. .........
District ......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा [signature] 04/02/26
Signature and Thumb Impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही [signature]
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ......... निलेश पाटील
पदनाम Rank ......... पोलीस निरीक्षक
तपासिक अ. चा कोड क्र. Posting ला. प्र. वि. मुंबई विभाग.
Code No. of I. O. .........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ......... ०४/०२/२६
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत | 2 फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report